3 र्‍या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !

पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

ईश्वर टी अँण्ड नाष्टा सेंटर
संपूर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी

प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४५८ वा ● सोमवार, ता. ०१ डिसेंबर २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

## कोणतेही मतभेद नाहीत, यापुढेही राहणार नाहीत : मुख्यमंत्री सिद्धरामय्या



**बेंगळूरु । श्रीकांत काकतीकर**

कर्नाटकमध्ये गेल्या महिनाभरापासून मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांच्यात मतभेद असल्याची राजकीय चर्चा चांगलीच रंगली होती. या पार्श्वभूमीवर दोन्ही नेत्यांनी आज संयुक्त पत्रकार परिषद घेत स्पष्ट केले की, आमच्यात कोणतेही मतभेद नाहीत आणि यापुढेही राहणार नाहीत. भाजप आणि जेडीएसच्या गटकारस्थानांना आम्ही दोघे मिळून समर्थपणे तोंड देऊ, असेही सिद्धरामय्या यांनी सांगितले. काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाच्या सूचनेनुसार, मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी आज सकाळी डी.के. शिवकुमार यांना आपल्या निवासस्थानी चहापानासाठी आमंत्रित केले होते. त्यानंतर माध्यमांशी बोलताना सिद्धरामय्या म्हणाले, ''पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी आम्ही दोघांना एकत्रितपणे काम करावे लागेल. मागील विधानसभा निवडणुकीत आम्ही एकत्र काम करून मोठे यश मिळवले. आगामी २०२८ विधानसभा निवडणूक, तसेच पंचायत समिती, जिल्हा परिषद व ग्रामपंचायत निवडणुका यासाठीही आम्ही एकजूट होऊन काम करणार आहोत.'' ते पुढे म्हणाले, ''आमच्या चर्चेत संघटनात्मक कामकाज, आगामी राजकीय कार्यक्रम आणि निवडणूक तयारीबाबत सविस्तर चर्चा झाली. आमच्यात कोणताही वाद नसून भविष्यातही असा कोणताही मतभेद राहणार नाही.'' बेळगावात ८ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात विरोधी पक्ष भाजप आणि जेडीएस अविश्वास ठराव आणणार असल्याची चर्चा आहे. याबाबत सिद्धरामय्या म्हणाले, ''भाजप आणि जेडीएस खोटे आरोप व अफवा पसरवत आहेत. त्यांच्या आरोपांना सरकार अधिवेशनात ठामपणे सामोरे जाईल. या विषयावरही माझी डी.के. शिवकुमार यांच्यासोबत सविस्तर चर्चा झाली आहे.'' मागील काही दिवसांत मुख्यमंत्रीपदाच्या विषयावरून सिद्धरामय्या आणि शिवकुमार यांच्यातील तणाव वाढल्याचे चित्र होते. मात्र दोघांनी एकत्र बसून चर्चा केल्यानंतर राजकीय मतभेदाचे वादळ शांत झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

## टीईटी परीक्षेसाठी ४५३९ अर्ज; ९ व १० डिसेंबरला परीक्षा

**पणजी । रयत समाचार**

गोवा शालान्त मंडळातर्फे आयोजित होणाऱ्या शिक्षक पात्रता चाचणी (टीईटी) परीक्षेसाठी यंदा एकूण ४५३९ अर्ज प्राप्त झाले असून, राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार इयत्ता १ ते ८वीपर्यंतच्या शिक्षकांसाठी टीईटी बंधनकारक झाल्याने उमेदवारांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. अर्ज करण्याची अंतिम मुदत नोव्हेंबरमध्ये संपली असून, शालान्त मंडळाचे अध्यक्ष भगीरथ शेट्ये यांनी याबाबत माहिती दिली. टीईटी परीक्षा ९ आणि १० डिसेंबर रोजी दोन दिवसीय पद्धतीने घेण्यात येणार आहे. पहिला पेपर इयत्ता १ ते ५वी शिकवण्यासाठी आवश्यक असलेला पेपर १ हा ९ डिसेंबर रोजी दुपारी ३ ते ५.३० वाजेपर्यंत होईल. या पेपरसाठी १८५७ उमेदवारांनी अर्ज केला आहे. तर पेपर २ इयत्ता ६ ते ८वीसाठी १० डिसेंबर रोजी दुपारी ३ ते ५.३० दरम्यान होणार असून, त्यासाठी २३७५ उमेदवारांनी नोंदणी केली आहे. दोन्ही पेपर्ससाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांची संख्या ३०७ आहे. परीक्षेसाठी उत्तर आणि दक्षिण गोव्यात दोन केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. उत्तर गोव्यातील उमेदवारांसाठी सेंट झेवियर उच्च माध्यमिक विद्यालय, म्हापसा, तर दक्षिण गोव्यातील उमेदवारांसाठी रोझरी उच्च माध्यमिक विद्यालय, नावेली ही केंद्रे ठरविण्यात आली आहेत. उमेदवारांच्या सोयीसाठी सर्व सुविधा उपलब्ध करण्यासाठी मंडळाकडून तयारी पूर्ण करण्यात आल्याचे अध्यक्ष शेट्ये यांनी सांगितले. टीईटी परीक्षा १५० गुणांची असून उत्तीर्णतेचे निकषही स्पष्ट करण्यात आले आहेत. सर्वसाधारण गटातील उमेदवारांना ९० गुण (६० टक्के), तर अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय गटातील उमेदवारांना ८३ गुण (५५ टक्के) मिळवणे अनिवार्य आहे. टीईटी एकदा उत्तीर्ण केल्यानंतर उमेदवाराला कोणत्याही वेळी शिक्षक पदासाठी अर्ज करण्याची पात्रता कायम राहते. तसेच, ही परीक्षा देण्यावर कोणत्याही प्रकारचे बंधन नाही; उमेदवाराला इच्छेनुसार कितीही वेळा परीक्षा देता येते. इयत्ता १ ते ८वीपर्यंतच्या शिक्षक भरती प्रक्रियेसाठी आवश्यक असलेली ही पात्रता चाचणी सुरळीत पार पाडण्यासाठी शालान्त मंडळाकडून सर्व तयारी पूर्ण झाली असून परीक्षाकेंद्रांवर सुरक्षेची आणि शिस्तीची विशेष काळजी घेतली जाणार आहे.

## निवडणुका कायद्याच्या कचाट्यात

**अहमदनगर । रयत समाचार**

जिल्ह्यातील कोपरगाव, देवळाली प्रवरा, नेवासा आणि पाथर्डी या चार नगरपरिषदांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. संबंधित ठिकाणी नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांविरोधात दाखल झालेल्या न्यायालयीन अपीलांमुळे हा निर्णय घेण्यात आला. याचबरोबर सात नगरसेवक पदांच्या उमेदवारांविरोधातही न्यायालयात अपील प्रलंबित असल्याने त्या प्रभागांतील मतदान प्रक्रिया देखील स्थगित करण्यात आली आहे. न्यायालयीन प्रक्रियेच्या निकालानंतरच पुढील अंमलबजावणी होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. नवीन निवडणूक कार्यक्रमानुसार : माघार घेण्याची अंतिम मुदत : १० डिसेंबर, मतदान दिनांक : २० डिसेंबर, मतमोजणी २१ डिसेंबर.

# हिवाळी अधिवेशनासाठी राजधानी सज्ज

**नवी दिल्ली । रयत समाचार**

राजधानी दिल्लीत हिवाळी अधिवेशनाची तयारी पूर्ण झाली असून सोमवार, १ डिसेंबरपासून अधिवेशनाला सुरुवात होणार आहे. हे अधिवेशन १९ डिसेंबरपर्यंत चालणार असून या कालावधीत केंद्र सरकार लोकसभा आणि राज्यसभेत १४ महत्त्वाची विधेयके सादर करणार आहे. अधिवेशनात अनेक राजकीय मुद्द्यांवर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये गदारोळ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

अधिवेशनापूर्वी नेहमीप्रमाणे सर्वपक्षीय बैठक घेण्यात आली. केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला जेपी नड्डा, किरेन रिजिजू, मल्लिकार्जुन खरगे, गौरव गोगोई, प्रमोद तिवारी, कोडिकुनिल सुरेश, तसेच तृणमूल काँग्रेसचे डेरेक ओ'ब्रायन, समाजवादी पक्षाचे राम गोपाल यादव, द्रमुकचे तिरुचित शिवा आदी नेते उपस्थित होते.

बैठकीत विरोधी पक्षांनी अधिवेशनाच्या कालावधीवर आक्षेप घेत महत्त्वाच्या मुद्द्यांवर सखोल चर्चा होण्याची गरज असल्याचे सांगितले.

### १५ दिवस चालणार कामकाज



**सादर होणारी १४ महत्त्वाची विधेयके**

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०२५ : दिवाळखोरी आणि दिवाळखोरी संहिता (सुधारणा) विधेयक, २०२५ : मणिपूर वस्तू आणि सेवा कर (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ : रद्द करणे आणि सुधारणा विधेयक, २०२५ : राष्ट्रीय महामार्ग (सुधारणा) विधेयक, २०२५ : अणुऊर्जा विधेयक, २०२५ : कॉर्पोरेट कायदे (सुधारणा) विधेयक, २०२५ : सिक्युरिटीज मार्केट्स कोड बिल , २०२५ : विमा कायदे (सुधारणा) विधेयक, २०२५ : मध्यस्थी आणि सामंजस्य (सुधारणा) विधेयक, २०२५ : भारतीय उच्च शिक्षण आयोग विधेयक, २०२५ : केंद्रीय उत्पादन शुल्क (सुधारणा) विधेयक, २०२५ : आरोग्य सुरक्षा उपकर/राष्ट्रीय सुरक्षा सेस बिल, २०२५ : २०२५-२६ आर्थिक वर्षातील व्यवसाय अनुदानासाठी पुरवणी मागण्या.

या हिवाळी अधिवेशनात १ डिसेंबर ते १९ डिसेंबरदरम्यान एकूण १५ कामकाजाचे दिवस ठरवण्यात आले आहेत. सामान्यतः हिवाळी अधिवेशनात सुमारे २० कामकाजाचे दिवस असतात. त्यामुळे यंदाच्या मर्यादित कालावधीबाबत विरोधकांनी नाराजी व्यक्त केली. विरोधकांच्या म्हणण्यानुसार, ''महत्त्वाच्या राष्ट्रीय मुद्द्यांवर चर्चा करायची असल्यास जास्त दिवसांची आवश्यकता आहे.'' अद्याप सरकारकडून या आक्षेपाला उत्तर देण्यात आलेले नाही.

या विधेयकांसह देशातील मणिपूर परिस्थिती, आर्थिक धोरणे, महागाई, बेरोजगारी, सीमावर्ती सुरक्षेचे प्रश्न यांसारखे विषय विरोधी पक्षांकडून आक्रमकपणे उपस्थित केले जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे हिवाळी अधिवेशनात जोरदार आरोप प्रत्यारोप पाहायला मिळतील, असा अंदाज राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

# 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्किट' अनुभवण्याची संधी


### महापरिनिर्वाण दिनानिमित्त पर्यटन विभागाचा पुढाकार

**मुंबई । गुरूदत्त वाकदेकर**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महाराष्ट्र पर्यटन संचालनालयातर्फे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर टूर सर्किट'चे आयोजन करण्यात आले. चैत्यभूमीला भेट देणाऱ्या नागरिकांसाठी ही टूर सर्किट पूर्णपणे निःशुल्क ठेवण्यात आली आहे. या उपक्रमाद्वारे पर्यटकांना डॉ. आंबेडकरांच्या प्रेरणादायी कार्याचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे.

पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले, हा सर्किट केवळ पर्यटनाचा नाही, तर तो भारतीय लोकशाहीच्या पायाचे दिग्दर्शन करणारा प्रवास आहे. डॉ. आंबेडकरांच्या विचारांना आणि सामाजिक परिवर्तनाच्या लढ्याला हे अभिवादन आहे.

या टूर सर्किटमध्ये मुंबईतील प्रमुख आंबेडकरी स्थळांचा समावेश करण्यात आला आहे. त्यात चैत्यभूमी, राजगृह, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इकॉनॉमिक्स अँड कॉमर्स कॉलेज (वडाळा), डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन तसेच परळ येथील बीआयटी चाळ, सिद्धार्थ कॉलेज आणि फोर्ट परिसराचा समावेश आहे. या सर्व स्थळांवरून डॉ. आंबेडकरांच्या सामाजिक समता, शिक्षण आणि संविधाननिर्मितीतील योगदान पर्यटकांना




अनुभवता येईल.संचालनालयाने या सर्किटद्वारे इतिहास, संस्कृती आणि सामाजिक परिवर्तनाचा धागा एकत्र आणला आहे. दररोज तीन बसेस या टूरसाठी उपलब्ध असतील. सहभागी पर्यटकांना निःशुल्क प्रवास, मार्गदर्शक आणि अल्पोपहार यांची सुविधा पुरवली जाईल. 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्त्वावर नोंदणी होणार आहे.

या प्रेरणादायी प्रवासाची सुरूवात ता.३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता वीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, शिवाजी पार्क (गणपती मंदिरासमोर) येथून होईल. सहलीचा समारोप चैत्यभूमी, दादर येथे करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी सूरज चतुर्वेदी ८१०८१७५५३०, पवन पवार ७६६६६०३२११, पर्यटन संचालनालय चॅटबोट क्र. ९९९३३०८८८३ यांना संपर्क साधावा.

## शिष्यवृत्ती परीक्षा २२ फेब्रुवारीला

**पुणे । शफीक बागवान**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक (इयत्ता ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ च्या तारखेत मोठा बदल करण्यात आला आहे. राज्य परीक्षा परिषदेने मोठा निर्णय घेत नवी तारीख जाहीर केली आहे. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) तर्फे केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (सीटीईटी) देखील ८ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. राज्यातील अनेक प्राथमिक व माध्यमिक शिक्षक सीटीईटी परीक्षेला बसणार असल्याने त्यांच्याकडून शिष्यवृत्ती परीक्षेची तारीख बदलण्याची मागणी करण्यात आली होती. त्या पार्श्वभूमीवर परिषदेने शिष्यवृत्ती परीक्षेच्या तारखेत बदल करण्यात आला आहे. परिषदेने शिष्यवृत्ती परीक्षेचा दिवस बदलत नवीन ता. २२ फेब्रुवारी २०२६ जाहीर केली आहे. सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी, पालकांनी, शाळांनी व परीक्षा केंद्रांनी या बदलाची नोंद घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी केले आहे.

# राज्य सांस्कृतिक पुरस्कार जाहीर

### ज्येष्ठ-युवा कलावंतांचा लवकरच सन्मान

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

कलेच्या विविध क्षेत्रांत दीर्घकाळ उल्लेखनीय योगदान देणाऱ्या ज्येष्ठ आणि युवा कलावंतांचा राज्य सांस्कृतिक पुरस्कारांतर्गत गौरव करण्यात येणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी दिली. नाटक, कंठसंगीत, उपशास्त्रीय संगीत, वाद्यसंगीत, मराठी चित्रपट, कीर्तनसमाजप्रबोधन, तमाशा, शाहिरी, नृत्य, लोककला, आदिवासी कला, झाडीपट्टी, दशावतार, मौखिक परंपरा, संग्रहालय, संगीत संयोजन, ध्वनीतंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रांचा या पुरस्कारांत समावेश आहे. या पुरस्कारांचे स्वरूप ज्येष्ठ कलावंतांसाठी



तीन लाख रुपये तर युवा कलावंतांसाठी एक लाख रुपये, मानचिन्ह, सन्मानपत्र आणि शाल असे आहे. लवकरच मुंबईत होणाऱ्या भव्य सोहळ्यात सर्व विजेत्यांना हा सन्मान प्रदान केला जाणार आहे. या पुरस्कारांसाठी राज्यातील तसेच देशातील विविध भागातील मान्यवरांची अधिकृत यादी जाहीर झाली आहे. ज्येष्ठ पुरस्कार विजेत्यांमध्ये २०२५ या वर्षी अरुण कदम (नाटक), धनंजय जोशी (कंठसंगीत), विजय चव्हाण (वाद्यसंगीत), शिवाजी लोटन पाटील (मराठी चित्रपट), उदय भवाळकर (उपशास्त्रीय संगीत), गहिनीनाथ औसेकर (कीर्तन/समाजप्रबोधन), कोंडीराम आवळे (तमाशा), मधुकर मोरे (शाहिरी), रंजना फडके (नृत्य), हरिभाऊ वेरुळकर (लोककला), रायसिंग पाडवी (आदिवासी कला), चंद्रकांत घरोटे (कलादान), तसेच संजीव भागवत, अ रविंद राजपूत, कल्पना जावळीकर, गोदावरी मुंडे यांसारख्या अनेक ज्येष्ठांची नावे समाविष्ट आहेत. युवा पुरस्कार विजेत्यांमध्ये तेजश्री प्रधान (नाटक), भूषण कडू, मयूर सुकाळे, वरद कठापूरकर, शंतनु रोडे, भाग्येश मराठे, अमृता थोरात, अनिता खरात, संतोष भांगरे, चेतन बेले, गंगूबाई भगत, सिद्धेश कलिंगण, तेजस्विनी आचरेकर, वैशाली वाफळेकर, रामानंद उगले, सर्वजीत पोळ, दुधराम कावळे, प्रसाद गरुड, निलेश सकट, विराज भोसले, अमित पाध्ये, समिरा गुजर या युवा कलावंतांचा समावेश आहे. सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी आणि मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सर्व पुरस्कारप्राप्तांचे अभिनंदन केले असून, राज्यातील सांस्कृतिक परंपरा जपणाऱ्या आणि पुढे नेणाऱ्या कलावंतांना हा सन्मान प्रेरणादायी ठरेल, असे मत व्यक्त केले आहे.

### ईडीच्या तपासात नवे धागेदोरे

## नॅशनल हेराल्ड प्रकरणी गांधी परिवारावर मनी लॉन्ड्रिंगचा आरोप

**नवी दिल्ली । रयत समाचार**

नॅशनल हेराल्ड प्रकरणात काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, त्यांचे खासदार पुत्र राहुल गांधी, तसेच दिवंगत नेते मोतीलाल व्होरा, ऑस्कर फर्नांडिस आणि दुबे, पित्रोडा यांच्यासह यंग इंडियन या खासगी कंपनीवरही मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात गंभीर आरोप ठेवण्यात आले आहेत. सुमारे ₹२,००० कोटींच्या मालमत्तेचा कथित गैरव्यवहार आणि (असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड) च्या मालमत्तेच्या फसवणूकपूर्वक ताब्यातील या प्रकरणात ईडीने चार्जशीट दाखल केली असल्याची माहिती समोर आली आहे.

एजेएल ही नॅशनल हेराल्ड या वृत्तपत्र व वेबसाईटची मालक संस्था असून ती यंग इंडियन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या मालकीची आहे. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी हे यंग इंडियन कंपनीतील प्रमुख शेअरधारक असून प्रत्येकी ३८% वाटा त्यांनी धारण केला आहे. काही वर्षांपूर्वी या प्रकरणात ईडीने दोघांचीही अनेक तास चौकशी केली होती. ईडीच्या दाव्यानुसार त्यांच्या तपासात



हे ''निर्णायकपणे सिद्ध'' झाले की यंग इंडियन ही कंपनी, जी गांधी परिवाराच्या ''लाभदायक मालकी''तील असल्याचे सांगितले जाते, तिने एजेएलच्या ₹२,००० कोटींच्या संपत्तीवर केवळ ₹५० लाखांत कब्जा मिळवला. या व्यवहारात मालमत्तेच्या किंमतीचे जाणीवपूर्वक कमी मूल्यमापन केल्याचा संशय ईडीने व्यक्त केला आहे. चार्जशीटमध्ये कथितपणे असा आरोप करण्यात आला आहे की सोनिया गांधी यांनी एआयसीसीच्या अध्यक्षा पदाचा ''दुरुपयोग'' करून स्वतःला आणि राहुल गांधींना वैयक्तिक लाभ मिळवून दिला. सार्वजनिक निधीचा गैरवापर करून तो यंग इंडियन या कंपनीमार्फत स्वतःच्या हितासाठी वळवण्यात आल्याचा गंभीर आरोप त्यात नमूद आहे. या प्रकरणातील पुढील कार्यवाहीकडे देशाचे लक्ष लागले असून काँग्रेसने यापूर्वी या सर्व आरोपांना राजकीय सूड आणि आधारहीन असल्याचे म्हटले आहे.

## भाजपाचे आठवलेंवरचे प्रेम पुतना मावशीचे- आकाश काळोखे

**पाथर्डी । रयत समाचार**

सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले हे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे राष्ट्रीय स्तरावरील नेते आहेत. परंतु भारतीय जनता पार्टीने पाथर्डी नगर परिषद निवडणूक २०२५ च्या प्रचार पत्रिका व बॅनरयावर त्यांचा एकही फोटो लावलेला नाही. तसेच प्रचारात त्यांच्या नावाचा उल्लेख केला नाही हा त्यांचा अपमान आहे. हा अपमान केवळ एका व्यक्तीचा नव्हे, तर त्यांनी प्रतिनिधित्व केलेल्या विचारांचा आणि समाजाचा अपमान आहे. यावरुन भाजपाचे आठवले प्रेम हे संधीसाधू व पुतना मावशीसारखे असल्याचा आरोप आकाश काळोखे यांनी केला. आकाश काळोखे हे राष्ट्रवादी काँग्रेस अजीत पवार गटाकडून निवडणूक लढवत आहेत. त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, लोकशाहीत प्रत्येकाला आपली मते मांडण्याचा हक्क आहे. परंतु, असले अपमानजनक



कृत्य व अशोभनीय कृती सभ्य समाजात स्वीकारार्ह नाही. अशा प्रकारची कृत्ये सामाजिक सलोखा बिघडवणारी आहेत. रामदास आठवले यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत दलित आणि मागास वर्गाच्या हितासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. भारतीय जनता पार्टीने केलेला हा त्यांचा अपमान त्यांच्या सामाजिक व राजकीय योगदानाचा अनादर आहे. तसेच भारतीय जनता पक्ष हा पक्ष केवळ दलित व मागासवर्गीय समाजाचा वोट बँक म्हणून वापर करताना दिसत आहे. त्यामुळे नगरपरिषद निवडणूकित दलित व मागासवर्गीय समाज भारतीय जनता पार्टीवर बहिष्कार टाकत आहे.

## 'हिंद दी चादर' गुरु तेगबहादुर साहिब शहिदी समागमासाठी राज्यभर तयारी

**मुंबई । रयत समाचार**

'हिंद दी चादर' श्री गुरु तेगबहादुर साहिब यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त राज्यभर विविध प्रबोधनपर उपक्रम सुरू झाले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य प्रदर्शनी समितीची बैठक नुकतीच पार पडली. बैठकीत ता.७ डिसेंबर २०२५ रोजी नागपूर येथे होणाऱ्या मुख्य कार्यक्रमाच्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उपस्थित राहणार आहेत. बैठकीत कार्यक्रमाचे नियोजन, विशेष प्रदर्शनाचे सादरीकरण, विभागनिहाय शासकीय समन्वय. या मुद्द्यांवर भर देण्यात आला. बैठकीत घेतलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयानुसार भारतीय डाक विभाग श्री गुरु तेगबहादुर साहिब यांच्या छायाचित्रासह स्मृतिचिन्ह टपाल तिकीट जारी करणार आहे.

# एसटी आरक्षण रद्द न करण्याची भिल्ल असोसिएशनची मागणी

**अहमदनगर । रयत समाचार**

आगामी महानगरपालिका निवडणुकांत प्रभाग क्र. ७ (सावेडी नाकाभुतकर वाडी) हा अनुसूचित जमात (एसटी) आरक्षण प्रभाग घोषित झाल्यानंतर काही व्यक्तींनी "या भागात एसटी समाजाचे उमेदवार नाहीत" या कारणावरून आरक्षण रद्द करण्याची मागणी केली. या पार्श्वभूमीवर अहमदनगर जिल्हा भिल्ल असोसिएशनतर्फे मनपा आयुक्तांना निवेदन देऊन आरक्षण कायम ठेवण्याची मागणी करण्यात आली.




असोसिएशनचे अध्यक्ष सुनील माणिकराव ठाकरे यांनी निवेदनात स्पष्ट केले की, प्रभाग क्रमांक ७ मध्ये सावेडी नाका परिसरात भिल्ल अनुसूचित जमातीची अनेक कुटुंबे वास्तव्यास असून मतदारांचीही लक्षणीय संख्या आहे. समाजातील अनेक जण निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत, असेही त्यांनी नमूद केले.

निवेदनानुसार, प्रभागात ३०० ते ३५० एसटी भिल्ल मतदार असून, इच्छुक उमेदवारांचीही कमतरता नाही. त्यामुळे "एसटी उमेदवार नाहीत" या कारणावरून आरक्षण रद्द करण्याची मागणी तथ्यहीन असल्याचे असोसिएशनने ठळकपणे मांडले.

भिल्ल समाजाचे प्रतिनिधित्व अबाधित राहावे आणि प्रभाग क्र. ७ ला मिळालेले एसटी आरक्षण जैसे थे ठेवण्यात यावे, अशी मुख्य मागणी निवेदनातून करण्यात आली.

निवेदन देताना जिल्हा भिल्ल असोसिएशन अध्यक्ष सुनील ठाकरे, राम शिंदे, भरत खाकाळ, भाऊसाहेब फलपगारे, सुभाष गोलवड, पोपट गोलवड, चंद्रकांत माळी, दत्तात्रय गोलवड, ज्ञानेश्वर गोलवड, गोरख बनकर, रवि गोलवड आदी मान्यवर उपस्थित होते.

# डॉ. सौरभ हराळ 'इंटरनॅशनल हीरो अवॉर्ड'ने सन्मानित

**अहमदनगर । विजय मते**

नेत्रविज्ञान क्षेत्रात नाविन्यपूर्ण संशोधन आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून रुग्णसेवा उंचावणारे नगरचे युवा नेत्रतज्ज्ञ डॉ. सौरभ हराळ यांना महाराष्ट्र ऑप्थॅल्मिक सोसायटी (MOS) यांच्या वार्षिक अधिवेशनात गोवा येथे 'इंटरनॅशनल हीरो अवॉर्ड' प्रदान करण्यात आला. या अधिवेशनात देशभरातील नामांकित नेत्रतज्ज्ञ, संशोधक आणि आंतरराष्ट्रीय आरोग्य संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



हा सन्मान डॉ. पीयूष बन्सल, डॉ. शिरीष थोरात, डॉ. अनघा हिरुर, डॉ. नितीन उपाध्याय, डॉ. शहा यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. डॉ. हराळ यांच्या संशोधन, नेत्रशस्त्रक्रियेतील नव्या तंत्रज्ञानाचा वापर, कॅटॅरॅक्ट आणि रिफ्रॅक्टिव्ह सर्जरीतील प्रगत पद्धती आणि ग्रामीण भागात आधुनिक उपचार उपलब्ध करून देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांची अधिवेशनात विशेष दखल घेतली गेली.

पुरस्कार स्वीकारताना डॉ. हराळ म्हणाले, "हा सन्मान माझा नसून अहिल्यानगरातील जनतेचा विश्वास, रुग्णांचे आशीर्वाद आणि माझ्या टीमच्या परिश्रमांचे प्रतीक आहे. नगरमध्ये जागतिक दर्जाचे नेत्रउपचार उपलब्ध करून देण्याचे ध्येय पुढेही कायम ठेवणार आहे."

गेल्या काही वर्षांत डॉ. हराळ यांनी लेझर रिफ्रॅक्टिव्ह सर्जरी (चष्मा काढण्याच्या लेझर शस्त्रक्रिया) क्षेत्रात मोठा अनुभव मिळवला आहे. अत्याधुनिक लेझर तंत्रज्ञान, अचूक निदान आणि सुरक्षित शस्त्रक्रिया पद्धतीच्या माध्यमातून त्यांनी हजारो रुग्णांना चष्माकॉन्टॅक्ट लेन्सच्या त्रासातून मुक्त केले आहे. पुणेमुंबईसारख्या शहरांत जाण्याची गरज भासू नये म्हणून नगरमध्येच आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

त्यांच्या नेत्ररुग्णालयात कॅटॅरॅक्ट, रेटिना, ग्लॉकोमा, कॉर्निया, लेझर आणि रिफ्रॅक्टिव्ह सर्जरीच्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध आहेत. विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये संशोधन सादर करत त्यांनी राज्यासह देशातील रुग्णांमध्येही विश्वास निर्माण केला आहे.

या सन्मानानंतर नागरिक, सामाजिक संस्था आणि वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांकडून डॉ. हराळ यांच्या कार्याचे व्यापक कौतुक होत आहे.

# सेंट्रल बँकेच्या योजनांचा ग्राहकांनी लाभ घ्यावा– राजीव नयन

## गृह व वाहन कर्ज मेळाव्यात १५ कोटीचे कर्जवाटप

**अहमदनगर । समीर मन्यार**

ग्राहकांना उत्तम सुविधा देणे आणि त्यांचा विश्वास जपणे हे सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे प्रमुख ध्येय असून, बँकेच्या विविध ग्राहकाभिमुख योजनांचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक राजीव नयन यांनी केले. सेंट्रल बँक ऑफ इंडियातर्फे अहिल्यानगर येथे आयोजित भव्य रिटेल कर्ज मेळाव्यात वाहन कर्ज आणि गृहकर्ज मिळून २० ग्राहकांना १५ कोटी रुपयांचे कर्जवाटप करण्यात आले. अध्यक्षस्थान राजीव नयन यांनी भूषवले.




कार्यक्रमास नगर तालुका तहसीलदार स्वप्निल ढवळे, दिपक बांगर, उद्योजक शिवाजी डोके, चंदन मंगलम, अग्रणी बँक प्रमुख आशिष नवले, गुलजान गौहर, मयूर जामगावकर, सागर तनपुरे यांच्यासह बांधकाम व्यावसायिक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

तहसीलदार स्वप्निल ढवळे म्हणाले की, सेंट्रल बँक ही ग्राहकांची स्वदेशी व विश्वासार्ह बँक असल्याचे त्यांनी सांगितले. प्रास्ताविकात मयूर जामगावकर यांनी ग्रामीण भागाशी बँकेची नाळ आणि ग्राहकसेवेतील सातत्य यांचा आढावा सादर केला. "या मेळाव्यात २० ग्राहकांना १५ कोटी रुपयांचे गृह व वाहन कर्ज वितरित करण्यात आले. दोन वाहन वितरकांसोबत तसेच एका बांधकाम विकासकाबरोबर १२.५० कोटींचा सामंजस्य करार करण्यात आला," अशी माहिती त्यांनी दिली. सागर तनपुरे यांनी बँकेच्या विविध कर्ज योजनांची सविस्तर माहिती दिली.


यावेळी शिवाजीराव पालवे, गायकवाड, भोईटे सर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयूर जामगावकर, तर आभार आशिष नवले यांनी केले.

**जगातील फक्त दुसरी कर्तृत्वपूर्ण सिद्धी**

# वेदमूर्ती देवव्रत रेखी याचा शुक्ल यजुर्वेद 'दण्डक्रम पारायण' पूर्ण

**अहमदनगर । रयत समाचार**

वयाच्या अवघ्या १९ व्या वर्षी शुक्ल यजुर्वेद माध्यंदिन शाखेतील अत्यंत कठीण 'दण्डक्रम पारायण' पूर्ण करून वेदमूर्ती देवव्रत महेश रेखी यांनी महाराष्ट्राचा गौरव उंचावला आहे, अशी माहिती रा.स्व. संघ व बीजेपीचे तुषार भोसले यांनी दिली.



पुढे तुषार भोसले यांनी सांगितले, श्रीक्षेत्र काशी येथे सलग ५० दिवस, तब्बल १६५ तासांपेक्षा अधिक काळ, आणि तेही ग्रंथ न पाहता 'एकाकी' स्वरूपात संपन्न झालेले हे पारायण अनेक विद्वानांच्या उपस्थितीत पार पडले. वैदिक मौखिक परंपरेतील आठ विकृतींपैकी 'दण्डक्रम' ही सर्वाधिक गुंतागुंतीची व कठीण पद्धत मानली जाते.

इतिहासात व जगभरात फक्त दुसऱ्यांदा झालेले हे पारायण, तेही एका १९ वर्षीय महाराष्ट्राच्या सुपुत्राने, पूर्ण केल्याने विद्वत्वर्तुळातही अभिमानाची भावना व्यक्त होत आहे. काशी येथे अनेक मान्यवर व विद्वतजनांच्या उपस्थितीत देवव्रत रेखी यांना 'दण्डक्रम विक्रमादित्य' ही मानद पदवी प्रदान केली जाणार आहे. या अद्भुत कार्यापुढे आम्ही नतमस्तक आहोत, असे तुषार भोसले म्हणाले.

तसेच, हे विलक्षण कर्तृत्व पाहता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस निश्चितच या युवा वेदमूर्तींचा सन्मान करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# मुलांनी पालकांना व्यसनापासून रोखण्याचे धाडस करावे– तांबटकर

## मखदूम सोसायटीकडून मौलाना आजाद जयंती निमित्त व्यसनमुक्ती अभियान

**अहमदनगर । आबीद खान**

युवा पिढी दिवसेंदिवस तंबाखू, गुटखा, मावा आणि धुम्रपानासारख्या व्यसनांच्या आहारी जात असून, या व्यसनामुळे अनेकांचे जीवन उद्ध्वस्त होत आहे. कुटुंबेही संकटात सापडत आहेत. तरीही युवक व्यसन सोडण्यास तयार नसल्याचे चित्र दिसते. घरातील मुलांनीच आपल्या पालकांना व्यसनापासून रोखण्याचे धाडस करावे, असा ठाम संदेश रहेमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष व व्यसनमुक्तीचे प्रवक्ते युनुसभाई तांबटकर यांनी दिला.



मखदूम एज्युकेशन अँण्ड वेल्फेअर सोसायटीतर्फे स्वातंत्र्य सेनानी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दर्गा दायरा येथे व्यसनमुक्तीवर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास रहेमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनुसभाई तांबटकर, मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दुल्हेखान, अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेचे सहसचिव डॉ. कमर सुरुर, तसेच मुख्याध्यापक फैय्याज शेख उपस्थित होते.

पुढे बोलताना युनुसभाई तांबटकर म्हणाले की, "व्यसनाने संपूर्ण जगाला आपल्या विळख्यात घेतले आहे. भारतात तर व्यसनाचे प्रमाण झपाट्याने वाढताना दिसत आहे. या व्यसनांचे दुष्परिणाम दीर्घकाळ भोगावे लागत असल्याने व्यसनमुक्तीकडे गांभीर्याने लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे."

या वेळी डॉ. कमर सुरुर यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास कशा पद्धतीने करावा याची सखोल माहिती दिली. प्रास्ताविक शेख शाकेरा यांनी करून शाळेत वर्षभर राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचा आढावा सादर केला. सूत्रसंचालन नसीम शेख यांनी केले, तर आभार शेख ताहेरा यांनी मानले.

# स्वामी समर्थ मंदिरात दत्त जयंती उत्सवाचा शुभारंभ

**अहमदनगर । विजय मते**

सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवरील सावली सोसायटी येथे असलेल्या अक्कलकोट निवासी वटवृक्ष श्री स्वामी समर्थ सेवा संस्थेतर्फे दत्त जयंती उत्सवाला श्री स्वामी समर्थ मंदिरात सामूहिक गुरुचरित्र पारायण सोहळ्याने सुरुवात झाली.



या पारायण सोहळ्यास महिलांची उपस्थिती लक्षणीय असून, दुपारी महाआरतीनंतर भाविक मोठ्या भक्तिभावाने पारायणासाठी बसतात. पारायण सोहळ्याचे पौराहित्य निखिल देवरे आणि संदीप पाटील हे करीत आहेत.

दत्त जयंती उत्सवानिमित्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दत्तयाग, भजन संध्या, धार्मिक उपक्रमांसह सामाजिक बांधिलकी जपत जनकल्याण रक्तपेढीतर्फे रक्तदान शिबिराचे आयोजनही करण्यात आले आहे. उत्सवाची सांगता महाप्रसादाने होणार असून, भाविकांनी गुरुचरित्र पारायणाचा श्रवण व धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंदिर समितीतर्फे करण्यात आले आहे.



महात्मा फुले साहित्यरत्न पुरस्कार स्वीकारताना सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे; पुरस्कार प्रदान करताना पोलीस उपनिरीक्षक रतीलाल चौधर, नाट्य अभिनेत्री रत्ना पारखी आणि उपस्थित मान्यवर. ( छाया: एक्सप्रेस फोटो )

# आनंदधाम-अहिंसा चौक गतीरोधक बसविले

## अविनाश घुले यांचा पुढाकार ; नागरिकांकडून सत्कार

**अहमदनगर । रयत समाचार**

आनंदधाम परिसर ते अहिंसा चौक या महत्वाच्या मार्गाचे सिमेंट काँक्रीटीकरण पूर्ण झाल्यानंतर गेल्या काही महिन्यांपासून या रस्त्यावर लहान-मोठ्या अपघातांची मालिका सुरू झाली होती. वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे पादचारी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांची सुरक्षितता धोक्यात आली होती. या वाढत्या अपघातांचा विचार करून माजी नगरसेवक अविनाश घुले यांनी पुढाकार घेत अखेर या रस्त्यावर गतीरोधक बसविण्याचा प्रश्न मार्गी लावला. या उपक्रमाबद्दल स्थानिक नागरिकांनी त्यांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली.



या प्रसंगी अमोल पोखरणा, संजय कटारिया, दिलीप बोरा, पंकज गांधी, रितेश चोपडा, संचिन डुंगरवाल, सिद्धेश फलसौंदर, प्रशांत फुलसौंदर, दिलीप कटारिया, प्रकाश गुंदेचा, निलेश मेहेर, संजय भंडारी, जितू पोरवाल, रितेश कोठारी, दिप पोखरणा आदी नागरिक उपस्थित होते.

काँक्रीट रस्ता तयार झाल्यानंतर वाहनांचा वेग नियंत्रित न राहिल्यामुळे अपघातांची भीती अधिक वाढली होती. आनंदधाम आणि उज्वल नगर परिसरात जैन समाजाची दोन महत्वाची धार्मिक स्थळे असून, साधुसाध्वी रोज सकाळ-संध्याकाळ पायी मार्गक्रमण करतात. भरधाव वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे त्यांच्यासह सर्वसामान्य नागरिकांच्या जीवितासही धोका निर्माण झाला होता. रस्ता ओलांडणे अनेकांसाठी धोकादायक बनले होते.

गेल्या काही महिन्यांत झालेल्या अपघातांमध्ये अनेक ज्येष्ठ नागरिक जखमी झाले होते. काहींना वेगाने येणाऱ्या वाहनांनी धडक दिल्याच्या घटनाही समोर आल्या होत्या. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी तातडीने गतीरोधक बसविण्याची मागणी केली होती. त्या संदर्भात अविनाश घुले यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून अखेर रस्त्यावर गतीरोधक बसवून दिले. नागरिकांच्या महत्त्वाच्या मागणीची दखल घेऊन ती पूर्ण केल्याबद्दल नागरिकांनी घुले यांचे मन:पूर्वक आभार मानले.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

दैनिक रयत समाचार
अहमदनगर जिल्हा आवृत्तीसाठी...
त्वरित नियुक्त करणे आहेत
१४ तालुका प्रतिनिधी, १४ शहर प्रतिनिधी, १५ प्रेस फोटोग्राफर, १४ तालुक्यात किमान ५ ते ७ ग्रामीण वार्ताहर.
अनुभवींना प्राधान्य!
इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मानधनाच्या अपेक्षेसह मा. संपादक यांच्या नावे अर्ज करावा अर्ज या क्रमांकावर व्हॉटसअप करावा : 8805401800
आम्ही काय देणार
* पत्रकार म्हणून निवड झाल्यानंतर नियुक्तीपत्र, (Appointment letter) दैनिकाचे ओळखपत्र (PRESS I. Card)
एकाच वेळी प्रिंट व डिजिटल मिडियात काम करण्याची संधी.

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

# मनोहर पोटेंनी विकासकामांतून जनतेच्या मनात ठसा उमटवला

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा तालुक्यात लहानातल्या लहान संस्थेपासून निवडणूक पॅनलपर्यंत सर्वत्र नेतृत्वाच्या आधाराशिवाय काही उभे राहत नाही. मात्र, श्रीगोंदा शहराच्या विकासाला महानगराची दिशा देत, नागरी सुविधा उपलब्ध करून स्थानिक नेतृत्व निर्माण करण्याची किमया माजी नगराध्यक्ष मनोहर पोटे यांनी साधली.




ऑगस्ट २०१६ ते डिसेंबर २०१८ या अडीच वर्षांच्या कार्यकाळात शहरातील रस्ते, दुभाजक, पाणीपुरवठा योजना, सामाजिक केंद्र, कचरा वाहतूक साधने, प्रशासनावरील वचक अशा कामांमुळे नागरिकांनी पोटे यांच्यावर विश्वास टाकला. त्याचा परिणाम म्हणून जानेवारी २०१९ मध्ये त्यांच्या पत्नी शुभांगी पोटे या तब्बल १६०० मतांच्या फरकाने नगराध्यक्ष म्हणून निवडून आल्या आणि विकासाची घोडदौड पुढे सुरूच राहिली.

यानंतर लगेच लोकसभा निवडणूक आचारसंहिता, मग काही महिन्यांत विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागू झाली. दरम्यान, नव्या सरकारमध्ये नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांनी मनोहर पोटे यांच्या कार्याचा गौरव करत विकासनिधी उपलब्ध करून दिला. त्यानंतर कोरोना महामारी ओढावली आणि सर्व जनजीवन विस्कळीत झाले असताना पोटे दाम्पत्याने वर्क फ्रॉम होमऐवजी वर्क ऑन रोड करत विकास रोखला नाही.

याच काळात रोहिदास चौकछत्रपती शिवाजी चौक मेनरोडचे काम पूर्ण झाले. वाडी- वस्ती भागांचा विकास गतीमान झाला. पोटे यांचा मूळ प्रभाग १ होता, मात्र त्यांनी शब्द दिल्याप्रमाणे प्रभाग ४ (सध्याचा प्रभाग ७) मधील रखडलेल्या कामांना गती दिली. साई नगरातील ३० वर्षे रखडलेले रस्ते, कुंभार गल्लीतील सिमेंट रस्ता व पेव्हिंग ब्लॉक, रविवार पेठशनी चौक जोडणाऱ्या मुख्य रस्त्याचे सिमेंटिकरण अशा महत्त्वाच्या कामांची पूर्तता झाली.

ओपन स्पेस डेव्हलपमेंटची कामे पूर्ण झाली. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मारकाची संकल्पना मार्गी लागली. बाह्यवळण (बायपास)जवळ क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले स्मारक आकाराला आले. पोटे दाम्पत्य रोज नगरपरिषद कार्यालयात हजर राहून नागरिकांचे प्रश्न प्राधान्याने सोडवत होते. कामांच्या वेगावरून राजकारणात टीका- आरोप सुरू झाले. सरकार बदलले, महायुती स्थापन झाली, पण नगरविकास खाते पुन्हा एकनाथ शिंदे यांच्याकडेच होते आणि त्यांनी मनोहर पोटेंना पूर्ण पाठबळ दिले. चौकशीचा ससेमिरा असूनही पोटे यांच्या कामांची गती कमी झाली नाही. शिंदे यांनी त्यांना शिवसेनेत प्रवेश देत आणखी विकासकामे आणि निधीचे आश्वासन दिले. निवडणुका लांबणीवर पडल्या. दीड वर्षांनी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका जाहीर झाल्या. सर्वेक्षणात पोटेंच्या नावाला जोर मिळताच काही घटक पक्षांनी विरोध दर्शविला. यावेळी एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले "स्वतंत्र लढा द्या; नगराध्यक्ष पदासह बहुमत मिळवा, विकासनिधी कमी पडू देणार नाही." आणि त्यानंतर श्रीगोंद्यात शिवसेनेचा पॅनल उभा राहिला.

# नगर-मनमाड रस्ता विखे, थोरातांसाठी प्रतिष्ठेचा; लाखो प्रवाशी नाराज

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

विधानसभा निवडणुकीनंतर पालकमंत्री राधाकृष्ण विखे, बाळासाहेब थोरात यांच्यातून विस्तवही जात नाही. सध्या या नगरपालिकेच्या निवडणुकीच्या हंगामात या दोघांनी एकमेकांना कोपरखळ्या मारीत निवडणुकीत रंग भरला आहे. मतदारांची त्यामुळे करमणूक आणि यानिमित्ताने चर्चाही होत आहे.

सध्या नगर-मनमाड रस्ता हा नगर जिल्ह्यात मोठ्या चर्चेचा झाला आहे. " जिल्हा नको, पण नगर मनमाड रस्ता करा " अशा प्रकारची मागणी हजारो नागरिकांनी यापूर्वीच मागणी केली आहे. यावरून संपूर्ण नगर जिल्ह्यात मोठी चांगली चर्चा रंगली आहे.

अलीकडे पालकमंत्री राधाकृष्ण विखे नगर पालिकांच्या निवडणुकीसाठी संपूर्ण नगर जिल्हा पिंजून काढत आहेत. संगमनेर येथील एका सभेत " विकासासाठी आम्हास मतदान करा " असे भावनिक आव्हान ते करीत आहेत.





त्यास माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी सडेतोड उत्तर देत विखे यांची बोलती बंद केली. संगमनेरचा विकास करण्याऐवजी तेवढा नगर मनमाड रस्ता करा असा बाळासाहेब थोरात यांनी मंत्री राधाकृष्ण विखे यांना सल्ला दिला आहे. आमदारकी राज्य तसेच केंद्रात सरकार आहे मग अजूनही हा नगर मनमाड रस्ता का होत नाही हाच का तो तुमचा विकास असा खोचक सवाल थोरात यांनी विखे यांना केला आहे.

सध्या नगर जिल्ह्यात हा रास्ता सर्वत्र मोठ्या प्रमाणात गाजत आहे. नगर मनमाड रस्त्याची सद्यस्थिती अतिशय वाईट आणि दुर्दैवी अशी झाली आहे. या रस्त्याने अपघातात आजपर्यंत शेकडो बळी घेतले आहेत. गेल्या काही वर्षांपासून हा रस्ता करण्याची मागणी होत असताना तो होत का नाही, असा न सुटणारा प्रश्न आता जिल्ह्यातील लाखो लोकांना पडला आहे. दरम्यान, या रस्त्यावरून हजारो प्रवासी प्रवास करत असताना हा प्रवास प्रवाशांना नकोसा झाला आहे. याबाबत मात्र सर्वत्र प्रचंड नाराजी असून कोणाला सांगावे म्हणजे हा रस्ता होईल असा प्रश्न प्रवासी एकमेकांना विचारीत आहेत. राजकीय आखाड्यात या रस्त्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून तो इतर प्रश्नापेक्षा सरस असा ठरला आहे. नगर मनमाड आता विखे थोरातांसाठी प्रतिष्ठेचा बनला आहे.

# उर्दू शाळांच्या शिक्षक प्रश्नात लक्ष घालणार- पालकमंत्री विखे

## उर्दू साहित्य परिषदेने शिक्षक कमतरतेकडे वेधले लक्ष

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

जिल्हा परिषदेच्या उर्दू शाळांमध्ये शिक्षकांची गंभीर कमतरता असून, शिक्षण विस्तार अधिकाऱ्याचे पद दीड वर्षांपासून रिक्त आहे. या परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून काही शाळा बंद पडण्याच्या उंबरठ्यावर आल्या आहेत. या समस्यांवर आपण तातडीने लक्ष घालणार असून प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करू, असे आश्वासन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.



नगरपालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी आज त्यांनी मिल्लतनगर भागात भेट दिली. यावेळी उर्दू साहित्य परिषदेचे जिल्हाध्यक्ष सलीमखान पठाण, समीर खान, सज्जाद हुसेन नवाब, जबीर सय्यद आणि सदस्यांनी निवेदन देऊन उर्दू शाळांमधील शिक्षकांच्या टंचाईकडे त्यांचे लक्ष वेधले. शिक्षक नसल्याने पालक आपल्या मुलांना उर्दू शाळांत प्रवेश देण्यास तयार नसल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे पटसंख्या घटत असून अनेक शाळांवर अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

पवित्र पोर्टलमार्फत जिल्ह्याला पाच शिक्षक मिळाले असून त्यांची प्राधान्याने शिक्षक नसलेल्या शाळांत नियुक्ती करण्याची मागणी परिषदेकडून करण्यात आली. त्यात जि.प. उर्दू शाळा पाचेगाव, माळी बाभुळगाव, केडगाव (अहिल्यानगर) आणि एकलहरे (श्रीरामपूर) या शाळांचा विशेष उल्लेख आहे. या शाळांमध्ये अनुक्रमे शिक्षक नसणे, एकच शिक्षक असणे किंवा लवकरच निवृत्त होणार असणे अशा गंभीर अडचणी असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

उर्दू विभागाचे शिक्षण विस्तार अधिकारी रमजान पठाण यांच्या निधनानंतर हे पद रिक्त आहे, ज्यामुळे उर्दू शाळांचे निरीक्षण, नियोजन व प्रशासकीय कामकाज ठप्प झाले आहे. हे पद तातडीने भरण्याची मागणी साहित्य परिषदेने केली.

शाळांवर पवित्र पोर्टलमधून येणारे शिक्षक उशिरा रुजू होत असल्याने पदे बराच काळ रिक्त राहतात. यामुळे उर्दू शाळांच्या परिस्थितीत आणखी बिघाड होत आहे. शिक्षकांच्या तातडीच्या गरजेनुसार ११ महिने किंवा २९ दिवसांच्या करारावर विशेष नियुक्त्या कराव्यात, तसेच पवित्र पोर्टलमार्फत येणाऱ्या शिक्षकांच्या नियुक्त्या उर्दू शाळांवरच प्राधान्याने कराव्यात, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय महासचिव अविनाश आदिक, माजी जि.प. सदस्य शरद नवले, दीपक पटारे, अभिषेक खंडागळे, समीर पटेल, अल्ताफ पटेल, ॲड. समीन बागवान, मुदस्सर शेख, समीरखान पठाण, सज्जाद नवाब, जाबीर सय्यद आदी उपस्थित होते.

# विचारांना कृतीची जोड असावी- महादेव गवळी

**पारनेर । रयत समाचार**

महात्मा फुले आणि सेनापती बापट यांनी कष्टकरी व शेतकरी यांच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेत लढा उभारला. महिलांना शिक्षण आणि सन्मान मिळावा यासाठी त्यांनी आयुष्यभर आग्रही भूमिका बजावली. त्यांनी केवळ विचार मांडले नाहीत, तर आपल्या कृतीत ते जगून दाखवले. त्यांच्या प्रेरणादायी आदर्शाप्रमाणे आपणही विचारांना कृतीची जोड दिली पाहिजे, असे मत आत्मनिर्धार फाऊंडेशनचे अध्यक्ष महादेव गवळी यांनी व्यक्त केले.



अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या सेनापती बापट विद्यालयात आयोजित महात्मा फुले व सेनापती बापट यांच्या संयुक्त स्मृतिदिन कार्यक्रमात अध्यक्षीय भाषण करताना ते बोलत होते. यावेळी महात्मा फुले व सेनापती बापट यांच्या प्रतिमांना पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास कवी ॲड. राहुल ठाणगे, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य प्रभाकर गुळवे, विद्यालयाचे मुख्याध्यापक रावसाहेब कासार यांच्यासह शिक्षकवृंद, सेवकवर्ग आणि विद्यार्थी उपस्थित होते.

गवळी म्हणाले की, सेनापती बापट यांच्या विचारांचे महत्त्व काही प्रमाणात दुर्लक्षित राहिले आहे. अलीकडेच त्यांच्या नावाने साहित्य संमेलनाचे आयोजन करून त्यांच्या योगदानाला उजाळा देण्याचा प्रयत्न करण्यात आला. यापुढील काळात सेनापती बापट यांच्या विचारांचा प्रचारप्रसार करण्यासाठी सामूहिक प्रयत्न आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक रोहिणी शेळके यांनी केले. विद्यालयाच्या विद्यार्थिनी आरोही बोरुडे व प्रणाली औटी यांनी सूत्रसंचालन केले, आभार प्रदर्शन विद्या ठुबे यांनी केले.




ही विजयाची नांदी की धाकधूक?

## किस्से निवडणुकीचे...

**सलीमखान पठाण**

### मित्रांची झाली मोठी पंचाईत




श्रीरामपूर - शहरात होत असलेल्या नगरपालिका निवडणुकीमध्ये वेगवेगळ्या पक्षांकडून वेगवेगळे उमेदवार निवडणूक लढवीत आहेत. त्यामुळे नेमक्या कोणत्या उमेदवारासाठी शब्द टाकावा अशी द्विधा अवस्था मित्र परिवाराची झाली आहे. शहरामध्ये अनेक सामाजिक शैक्षणिक धार्मिक व राजकीय क्षेत्रात काम करणारे प्रतिष्ठित लोक आहेत त्यांचे खूप मित्र देखील आहेत यापैकी अनेक निवडणुकीला उभे आहेत परंतु प्रत्येकाचा पक्ष वेगळा आहे एका प्रभागामध्ये कोणी काँग्रेसचा समर्थक आहे तर दुसऱ्या प्रभागामध्ये कोणी बीजेपीचा समर्थक आहे तिसऱ्या प्रभागांमध्ये कोणी शिवसेनेचा आहे तर चौथ्या प्रभागांमध्ये अपक्ष आहे. त्यामुळे कुठल्याही एका पक्षाचा प्रचार किंवा समर्थन करताना या मंडळींची मोठी अडचण होत आहे. प्रत्येक भागामध्ये उमेदवार वेगळे असल्याने प्रत्येकाची पसंती देखील वेगळी आहे. त्यामुळे एका भागामध्ये एका पक्षाच्या उमेदवाराला समर्थन देतानाच दुसऱ्या प्रभागात मात्र दुसऱ्या पक्षाच्या उमेदवाराचे ते समर्थन करताना दिसत आहेत. काही उमेदवारांनी निवडणुकीआधी पक्षांतर केल्याने सुद्धा मोठी गल्लत होत आहे; कारण एखादा उमेदवार हा राष्ट्रवादीचा असे वाटत असताना तो काँग्रेसमध्ये गेलेला आहे तर दुसरा उमेदवार काँग्रेसचाही असे वाटत असताना तो बीजेपी मध्ये गेला आहे. त्यामुळे बोलताना सुद्धा प्रत्येकाला भान ठेवावे लागत आहे. निवडणुकीच्या गदारोळामध्ये अनेक जवळचे मित्र एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. अशावेळी त्यांच्या मित्रपरिवाराची मात्र मोठी पंचाईत होत आहे. त्यामुळे दोघे आपलेच आहेत ज्याला द्यायचे त्याला मत द्या असे त्या ठिकाणी सांगितले जात आहे. एकूणच मित्र परिवाराला संकटात टाकणारी निवडणूक कोणाच्या पथ्यावर पडते याकडे बाकीच्या मित्रांचे लक्ष लागले आहे.

# खंडोबा मूर्ती प्राणप्रतिष्ठा व किर्तन महोत्सवाची सांगता

**नेवासा । विजय खंडागळे**

कांगोणी येथे आयोजित चार दिवसीय खंडोबा देव प्राणप्रतिष्ठा व किर्तन महोत्सवाचा समारोप मोठ्या उत्साहात झाला. पंढरपूर येथून आणलेल्या नव्या मूर्तीची भव्य मिरवणूक, दररोजची आरती, कीर्तन आणि महाप्रसाद अशा भक्तिमय वातावरणात भक्तांनी उपस्थिती लावली. कार्यक्रमाची सुरुवात रविवार, २३ नोव्हेंबर रोजी सायं. ५ वाजता पंढरपूरहून आलेल्या नव्या मूर्तीच्या भव्य मिरवणुकीने झाली. सोमवार, २४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी महाआरतीनंतर भागवताचार्य किशोर महाराज जाधव यांचे कीर्तन झाले आणि त्यानंतर महाप्रसाद वाटप झाले.

मंगळवार, २५ नोव्हेंबर रोजी युवा किर्तनकार भागवताचार्य शिवप्रसाद महाराज पंडित यांनी कीर्तन केले. बुधवार, ता. २६ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता महंत सुनिलगिरी महाराज, महंत रामकृष्ण महाराज शास्त्री, सिताराम पठाडे महाराज (गोधेगाव), स्वामी अमृतानंद सरस्वती माताजी यांच्या हस्ते व मोठ्या संख्येने उपस्थित भाविकांच्या साक्षीने श्री खंडोबा देवाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व मंदिरावर कलशारोहण सोहळा संपन्न झाला. सकाळी १० वाजता महंत रामकृष्ण महाराज शास्त्री यांच्या सुमधुर वाणीतील काल्याचे कीर्तन भक्तांनी ऐकले. पौराहित्य गणेश जोशी यांनी केले. संतपूजन शंकर शिंदे, बाळासाहेब रौंदळ, सचिन रौंदळ यांनी केले. महाप्रसादासाठी जालिंदर रौंदळ, आप्पासाहेब कातोरे, रावसाहेब कातोरे, कानिफनाथ ठोंबळ, अशोक राहींज, अनिल वडागळे (पुणे) यांनी सहकार्य केले.कार्यक्रमास सुनील गडाख, कारभारी पंडित, बाळकृष्ण सुडके, अशोक गाडेकर, राम खरवंडीकर, . देविदास आडभाई यांची उपस्थिती लाभली.

# नगरपरिषद निवडणुका वेळेत घ्या; आमचा गुलाल निश्चित- स्नेहलता कोल्हे

कोपरगाव । किसन पवार

नगरपरिषद निवडणूक आयोगाच्या परिपत्रकानुसार कोपरगाव नगरपरिषद निवडणुका पुढे ढकलल्या जात असताना, भारतीय जनता पार्टी आणि मित्रपक्षांनी निवडणूक निर्णय अधिकारी तसेच राज्य निवडणूक आयोगाला पत्राद्वारे निवडणुका नियोजित वेळेतच पार पाडाव्यात, कोणताही विलंब करू नये, अशी ठाम मागणी केली आहे.

मा. आ. स्नेहलता कोल्हे यांनीही मुख्यमंत्र्यांना तसेच राज्य निवडणूक आयोगाला निवेदन देत स्पष्ट केले की, कोपरगाव मतदारसंघात कोणताही उमेदवार अपात्र नाही आणि कोणतीही न्यायालयीन प्रक्रिया प्रलंबित नसल्याने निवडणुका वेळेत घेण्यात कोणताही अडथळा नाही



पत्रकार परिषदेत बोलताना स्नेहलता कोल्हे म्हणाल्या, "आज निवडणुका झाल्या तरी आमचा गुलाल निश्चित आहे. विरोधकांनी खोटा अपप्रचार करून जनतेची दिशाभूल करू नये."

एका विरोधी उमेदवाराने अचानक स्मारकावर जाऊन संविधानाची भाषा बोलण्याचा प्रयत्न केल्याबद्दल त्यांनी टीका करत म्हटले की, "हा केवळ स्वार्थासाठी केलेला दिखावा आहे."

कोल्हे पुढे म्हणाल्या, "शहरात कायदा-सुव्यवस्था बिघडणे, गोळीबार, धार्मिक तणाव, अतिक्रमण कारवाईदरम्यान झालेली सामान्यांची गैरसोय अशा अनेक घटना घडल्या. त्या वेळी विरोधकांना संविधानाची आठवण झाली नाही. महाराष्ट्रातील इतर ठिकाणी प्रक्रियेमुळे निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मतदारसंघातही अशीच परिस्थिती आहे. तिथेही विरोधकांनी संविधानाची भाषा बोलली आहे का?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

सोयीप्रमाणे भूमिका घेणे हे विरोधकांचे वैशिष्ट्य असल्याची टीका करत कोल्हे म्हणाल्या की, "निवडणुकीत पराभव निश्चित दिसत असल्याने विरोधक घाबरले आहेत. तो भीतीभाव लपवण्यासाठी वेगवेगळे आरोप करत आहेत. कोपरगावकरांनी भाजप आणि मित्रपक्षाला स्पष्ट कौल दिलेला आहे. निवडणूक जितक्या लवकर होतील, तितका आमचा विजय अधिक मोठा राहील."

"निवडणुका पुढे ढकलू नयेत यासाठी सर्व कायदेशीर प्रयत्न सुरू आहेत. आमचे कार्यकर्ते दुप्पट जोमाने कामाला लागले आहेत. कोपरगाव पुन्हा भाजपचा गड होणार, हे निश्चित आहे," असेही स्नेहलता कोल्हे यांनी स्पष्ट केले.

# नेपाळची नवी खोड

नेपाळ हा भारताचा सखखा शेजारी देश. जगातील एकमेव हिंदू धर्मीय देश. भारत हा देखील हिंदू संस्कृतीचा पाईक त्यामुळे दोन्ही देशातील चालीरीती, संस्कृती, सण, उत्सव, परंपरा सारखीच त्यामुळे नेपाळ हा भारताचा शेजारी असला तरी भारताने त्याला कायम छोट्या भावा सारखीच वागणूक दिली आहे. नेपाळवर ज्या ज्या वेळी संकटे आली त्या त्या वेळी भारतच धावून गेला त्यामुळे गेल्या अनेक शतकांपासून भारत आणि नेपाळचे संबंध मैत्रीपूर्ण आणि सौहार्दाचे राहिले आहेत मात्र या संबंधांना मागील काही वर्षात तडा गेला आहे. भारत नेपाळ संबंधातील सौहार्दात कटुता निर्माण होऊन दोन्ही देशात तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली आहे. हा तणाव कमी करून दोन्ही देशात पूर्वी प्रमाणे मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न भारताकडून होत असताना नेपाळ मात्र काही खोड काढून दोन्ही देशातील तणाव कायम ठेवत आहे. नेपाळने अशीच एक नवी खोड काढून दोन्ही देशातील तणाव पुन्हा वाढवला आहे. नेपाळने गुरुवारी १०० रुपयांच्या नोटेचे अनावरण केले. या नोटा छापण्याचे कंत्राट त्यांनी चीनमधील एका कंपनीला दिले आहे अर्थात तो त्यांचा अधिकार आहे. नोटा बदलण्याचा, त्याची डिझाईन बदलण्याचा, आणि त्याची छपाई कोठून करायची याचा सर्वस्व अधिकार नेपाळचा असल्याने भारताने त्यावर आक्षेप घेण्याचे कारण नाही भारताने यावर आक्षेप घेतला नाही मात्र या नोटाचे अनावरण करण्यात आले त्यावेळी मात्र भारताने त्यावर आक्षेप घेतला कारण या नव्या नोटेवर नेपाळने त्यांचा नवा सुधारित नकाशा छापला असून त्या नकाशात लीपुलेख, लिम्पियाधूरा आणि कालापाणी हे भूभाग नेपाळमध्ये दाखवले आहेत. वास्तविक भारत - नेपाळ सीमेवरील हे भूभाग भारतीय सीमेत आहे मात्र नेपाळ त्यावर दावा करत आहे. खूप वर्षापासून हा वाद चालू असल्याने दोन्ही देशात यावरून अनेकदा तणाव निर्माण झाला. हा वादग्रस्त भाग असल्याने नेपाळने त्यावर दावा करू नये असे भारताचे म्हणणे आहे. तरीही नेपाळ हा विषय ऐन केन प्रकरणाने उकरून काढत आहे. नेपाळ भारताची सातत्याने खोड काढत आहे कारण त्याला चीनची फुस आहे. मागील काही वर्षापासून नेपाळ हा चीनच्या नादी लागला आहे. चीनने नेपाळला कर्ज देऊन नेपाळला आपल्या अंकित केले आहे. नेपाळचे सध्याचे सरकार हे चीन धार्जिणे आहे. चीन सांगेल तेच ते करत आहे एकाअर्थी नेपाळमधील विद्यमान सरकार हे चीनच्या हातचे बाहुले आहे त्यामुळेच चीन सांगेल त्याप्रमाणे नेपाळचे सरकार वागत आहे. भारतानेही नेपाळला वेळोवेळी त्यांची चूक दाखवून खडसावले आहे आताही भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी भारताची बाजू स्पष्ट करतांना म्हंटले की नेपाळशही आम्ही आमच्या सीमा प्रकरणांवर एका प्रस्थापित मंचाद्वरे चर्चा करीत आहोत. दरम्यान त्यांच्या बाजूने त्यांनी काही एकतर्फी पावले उचलली आहेत, परंतु त्यांच्याकडून काहीही करून आमच्यातील परिस्थिती किंवा वास्तविकता बदलता येणार नाही. काय आहे सीमा वाद ? १८१६ मधील अँग्लो - नेपाळ युद्धानंतर नेपाळ आणि ब्रिटिश शासित भारत यांच्यात सुगौलीचा करार झाला. हा करार झाल्यापासून भारत आणि नेपाळ यांच्यात सीमावाद सुरू झाला. या करारानुसार काली नदीला नेपाळची नैसर्गिक पश्चिम सीमा म्हणून निश्चित करण्यात आली. काली नदीचा पूर्वेकडच्या भागात लिपुलेख, लिम्पियाधुरा आणि कालापानी हा भाग आहे. १९६० पासून हा भाग भारतीय प्रशासनाच्या नियंत्रणाखाली आहे. २०१९ साली नेपाळने या भूभागावर हक्क सांगितल्यावर भारताने त्यावर हरकत घेतली. त्यानंतर २०20 साली नेपाळने आपल्या नकाशात हा भूभाग दाखवला तेंव्हापासून दोन्ही देशात तणाव निर्माण झाला. भारताकडून हा तणाव कमी करण्याचा सातत्याने प्रयत्न होत असताना नेपाळ मात्र चीनच्या नादी लागून सतत भारताच्या कुरापती काढत आहे. आताही चलनी नोटेवर हा भूभाग दाखवून नेपाळने भारताची खोड काढून दोन्ही देशातील तणाव आणखी वाढवला आहे.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद



जामखेड नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात काढण्यात आलेल्या पोलिसांच्या भव्य रूट मार्चदरम्यान मुख्य रस्त्यावरून शिस्तबद्ध पथसंचलन करताना अधिकारी व पोलिस कर्मचारी. ( छाया: रिजवान शेख, जामखेड )

# इन्शाल्लाह, मैं सब करके दिखाऊंगा- पालकमंत्री विखे

## नागरी समस्या ऐकून विखे अवाक



**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

नगरपालिकेच्या निवडणुकीचा माहोल तापत असताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी वार्ड क्रमांक २ मधील काजीबाबा रोड, कुरेशी जमात खाना परिसर, नवी दिल्ली भाग आणि मिल्लतनगर येथे नागरिकांशी संवाद साधत पहिला झंझावाती प्रचार दौरा केला. या भागात भाजपाचे नेतृत्व पहिल्यांदाच सक्रिय दिसल्याने नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत बाबरपुरा चौकात त्यांचे मोठ्या जल्लोषात स्वागत केले

काही दिवसांपूर्वी काँग्रेसचे निष्ठावान पदाधिकारी अ‍ॅड. समीन बागवान भाजपमध्ये प्रवेश करून वार्ड २ मध्ये पक्षाची पकड वाढवण्याचे काम करत आहेत. या प्रयत्नांचे दर्शन विखे यांच्या दौऱ्यात स्पष्ट झाले. काजीबाबा रोड येथे त्यांनी हिंदी व उर्दूतून नागरिकांशी संवाद साधला.

या दौऱ्याला राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय महासचिव अविनाश आदिक, उमेदवार श्रीनिवास बिहानी, ताहेर बागवान, नितीन दिनकर, दीपक पटारे, साजिद मिर्झा, मुक्तार मणियार, यास्मिन दारूवाला, राजू दारूवाला, इंद्रनाथ पाटील थोरात, शरद नवले, केतन खोरे, अभिषेक खंडागळे, किशोर बनसोडे, खंडेराव सदाफळ, आसिफ पोपटिया, अकिल सुन्नाभाई यांच्यासह कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.

मिल्लतनगर येथे विखे पाटील यांनी नागरिकांना थेट त्यांची मते मांडण्यास सांगितले. संजय नगर, रामनगर, मिल्लतनगर आणि फातिमा कॉलनीतील महिलांनी अनेक समस्या स्पष्टपणे मांडल्या. संध्याकाळनंतर मुलींना बाहेर पडणे असुरक्षित असते, मैदानात दारू पिणाऱ्यांचा त्रास, ठाणेदारांकडून दुर्लक्ष, क्षेत्रात पोलीस चौकीची गरज, घाणेरडे पाणी, दवाखान्यांची कमतरता, रस्त्यांचा अभाव अशा समस्या महिलांनी सांगितल्या. या तक्रारी ऐकून विखे पाटील अवाक झाले. त्यांनी तत्काळ अतिरिक्त पोलीस अधीक्षकांना फोन करून परिसरातील त्रास थांबवण्याचे निर्देश दिले. नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांकडून गढूळ पाण्याचा अहवाल मागवला. भाजी मंडईसमोरील विस्थापित बागवान कुटुंबांना आणि गांधी पुतळ्याजवळील दुकानदारांना लवकरच दुकाने देण्याचेही आश्वासन दिले.

मिल्लतनगरातील एका महिलेनं सांगितले की, ''भंगारवाल्यांच्या वायरी जाळण्यानं धूर भरतो. आम्ही छोट्या घरात राहतो. श्वास घेणे कठीण होते.'' तसेच गटारांची समस्या, पावसाळ्यात पाणी घरात येणे अशा व्यथा नागरिकांनी मांडल्या.

अहिल्यानगर भागात सहा नंबर शाळेच्या मागील १५ शौचालयांपैकी १४ ची दारे तुटलेली असल्याची तक्रार महिलांनी केली. स्वच्छतेच्या अभावामुळे मोठी गैरसोय होत असल्याचे त्यांनी सांगितले.

बाबरपुरा परिसरातील ४०५० युवकांनी भाजपमध्ये प्रवेश केला. वैदूवाडा रोड ते बाबरपुरा चौकापर्यंत भाजपाचे झेंडे लावून विखे यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. या भागात पहिल्यांदाच कमळ चिन्ह दिसले.

''आजपर्यंत तुम्ही पंजाला मतदान केले, पण प्रश्न न सुटल्याने त्रासच झाला. तुम्ही आम्हाला साथ द्या, या संपूर्ण भागाचा विकास करू. इन्शाल्लाह, मैं सब करके दिखाऊंगा,'' असे विखे म्हणाले.

दुपारी तीन ते सायंकाळी साडेसातपर्यंत विखे पाटील यांनी काजीबाबा रोड, मिल्लतनगर, बाबरपुरा चौक, मुक्तार शहा निवासस्थान आणि नवी दिल्ली भागात एकूण पाच सभांत नागरिकांचे प्रश्न ऐकले. वार्ड क्रमांक दोनमध्ये हा विखे पाटील यांचा पहिलाच मोठा दौरा होता. मिळालेला भरभरून प्रतिसाद पाहून ते स्वतःही आश्चर्यचकित झाले. या भागाने यापूर्वी खासदार बाळासाहेब विखे पाटील यांना भरभरून प्रेम दिले होते; त्याचाच प्रत्यय पुन्हा आला.

नागरिकांच्या निर्भीड मांडणीमुळे स्थानिक समस्यांची गंभीरता उघड झाली आहे. सर्व तक्रारी नोंदवून विखेंची टीम आता यावर कोणती पावले उचलते, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष आहे.

# बालाजी मंदिराचा १३ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**नेवासा । विजय खंडागळे**

सोनई येथील श्री व्यंकटेश्वर बालाजी देवस्थानचा १३ वा वर्धापन दिन वर्षानुवर्षांप्रमाणे यंदाही भक्तिमय वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. वडार समाज बांधवांसह गावातील ज्येष्ठयुवक कार्यकर्ते, महिला भगिनी आणि श्रद्धाळू भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवाला विशेष उजाळा दिला.

रविवार, ता. ३० नोव्हेंबर २०२५ रोजी पहाटे ५ ते ११ या वेळेत महाअभिषेकाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मुख्य पुजारी भानू प्रसाद यांच्या मंत्रोच्चारात अभिषेक विधी अत्यंत शुचिर्भूत वातावरणात पार पडला. अभिषेकानंतर सर्व श्रद्धाळूंसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. हा महाप्रसाद गौतम त्रिंबक कुसळकर व त्यांच्या कुटुंबियांच्या वतीने देण्यात आला.



धार्मिक सोहळ्यास वेंकीज ग्रुप पुणेचे चेअरमन भाटिया, देवकर, कल्याण स्वामी, पवन सत्यनारायण यांसह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून उत्सवाची शोभा वाढवली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून नेवासा तालुक्याचे आमदार विठ्ठलराव लंघे, ज्येष्ठ मार्गदर्शक एस. बी. शेटे, किसन गडाख, सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी उपस्थित होते. मान्यवरांचे स्वागत व सत्कार वसंत कुसळकर, राहुल कुसळकर, नथुराम कुसळकर, रावसाहेब कुसळकर, सुरेश लष्करे, एकनाथ कुसळकर, तसेच ग्रामपंचायत सदस्य भानुदास कुसळकर यांच्या हस्ते करण्यात आला.

भक्तांना संबोधित करताना आमदार लंघे म्हणाले, ''मी प्रथमच श्री बालाजींच्या दर्शनासाठी आलो आहे. येथे येताच मन प्रसन्न झाले. देवस्थानचा वर्धापन दिन अत्यंत सुंदररित्या पार पडताना पाहून आनंद झाला.''

सोनई आणि परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. नियमित पूजा-अर्चना आणि बालाजी देवस्थानच्या परंपरेला सलाम करत हा वर्धापन दिन सोहळा भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

# ऋचा बोगा हिला आंतरशालेय राज्यस्तरीय स्पर्धेत सुवर्णपदक

## राष्ट्रीय कुराश स्पर्धेसाठी निवड

**अहमदनगर । समीर मन्यार**

इंदापूर (पुणे) येथे क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित आंतरशालेय राज्यस्तरीय स्पर्धा २०२५२६ उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत अहिल्यानगर येथील १४ वर्षाखालील मुलींच्या गटात ऋचा बोगा हिने ४४ किलो वजन गटात शानदार प्रदर्शन करून सुवर्णपदक पटकावले.

तिच्या या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर सहारनपूर (उत्तरप्रदेश) येथे आयोजित राष्ट्रीय शालेय कुराश स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे. ऋचा बोगा ही भाऊसाहेब फिरोदिया शाळेत इयत्ता ९ वीमध्ये शिकत असून, अत्यंत मेहनती व जिद्दी खेळाडू म्हणून तिची ओळख आहे.



या विजयानंतर ऋचा बोगा हिला राष्ट्रीय किर्तीचे मार्गदर्शक प्रा. संजय धोपावकर, आंतरराष्ट्रीय खेळाडू आदित्य धोपावकर, सोनाली साबळे, पै. गणेश लांडगे, पै. शुभम दातरंगे, अथर्व नरसाळे, गणेश शिंदे यांचे मौल्यवान मार्गदर्शन लाभले. ऋचाच्या या यशाबद्दल माजी नगरसेवक धनंजय जाधव, प्रा. संजय धोपावकर, प्राचार्य एम. एम. तांबे, मुख्याध्यापक दुगड, प्रा. कैलास साबळे, योगेश वाघस्कर, तसेच राजेंद्र बोगा, राकेश बोगा, पल्लवी बोगा, निर्मला बोगा, अमर येमूल, ज्ञानेश्वर गालपेल्ली आणि शिक्षकवृंद यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# पुरस्कारार्थींनी जबाबदारीने लेखन करून साहित्याचा दर्जा वाढवावा- सद्गुरू साहेबराव आवारे

## साहित्य पुरस्कारांचे वितरण संपन्न

**नगर तालुका । रयत समाचार**

सूक्ष्म निरीक्षण, चिंतन आणि समाजमनाचे आकलन यातून निर्माण होणाऱ्या साहित्यकृती समाजाला दिशा देतात. दर्जेदार साहित्याची निर्मिती आणि त्याचा सन्मान होणे ही अत्यंत महत्त्वाची सांस्कृतिक प्रक्रिया आहे. अक्षर साहित्य प्रतिष्ठान सद्गुरू साहेबराव आवारे यांच्या नावे पुरस्कार देऊन हीच भूमिका समर्थपणे निभावत आहे, असे प्रतिपादन विनोदी कथाकथनकार साहित्यिक डॉ. संजय कळमकर यांनी केले.



जेऊर बायजाबाई येथे सद्गुरू साहेबराव आवारे गुरुजींच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित अक्षर साहित्य पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे अध्यक्ष सिद्धिनाथ मेटे तर प्रमुख उपस्थितीत प्रा.शशिकांत शिंदे, डॉ.संजय बोरुडे, प्रा.हेमलता पाटील, ॲड.विनायक तोडमल, नवनाथ मगर, संदीप शेटे, संतोष घोलप, सचिन चोभे आदी मान्यवर होते.

पुढे डॉ.कळमकर म्हणाले, संत साहित्य आणि वारकरी परंपरा ही केवळ धार्मिक परंपरा नसून मानवी जीवनाला उन्नत करणारे तत्त्वज्ञान आहे. आवारे गुरुजींचे साहित्यिक, सामाजिक आणि आध्यात्मिक कार्याचा सुगंध संपूर्ण परिसरात दरवळत आहे. त्यांच्या नावाचा हा पुरस्कार ज्ञानपीठ व साहित्य अकादमी पुरस्कारांइतकाच मानाचा आहे. समाजात बोलके आणि कर्ते सुधारक दोन्ही असतात, त्यात आवारे गुरुजी हे कर्तृत्वाने सुधारणा करणारे व्यक्तिमत्त्व आहे.

सद्गुरू आवारे गुरुजी म्हणाले, साहित्य निर्मिती ही समाज घडवण्याची प्रक्रिया आहे. त्यामुळे पुरस्कारार्थींनी आणखी जबाबदारीने लेखन करून साहित्याचा दर्जा वाढवावा. त्यांनी सर्व विजेत्यांच्या साहित्यकृतींचा उल्लेख करून मार्गदर्शन केले.

पुरस्कारार्थी ज्ञानेश्वर महाराज बंडगर यांनी आपल्या मनोगतात सांगितले, वारकरी धर्म हा माणसांना जोडणारा धागा आहे. महाराष्ट्रातील गावखेड्यांनी ही परंपरा जपली आहे. त्या परंपरेवरील माझ्या पुस्तकाचा अक्षर प्रतिष्ठानने सन्मान केल्याचा आनंद आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिव अशोक निंबाळकर यांनी केले. सूत्रसंचालन स्वाती पाटील व डॉ. सूर्यकांत वरकड यांनी तर आभार प्रदर्शन सिद्धिनाथ मेटे महाराज यांनी केले.

### लबडे, बंडगर, जोपुळकर आणि घोडकेंचा गौरव

राज्यस्तरीय साहित्य पुरस्कारांतर्गत ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज बंडगर, सोलापूर. वैचारिक साहित्य : होय, होय वारकरी. प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे, कादंबरी : चिंबोरी युद्ध. सागर जाधव-जोपुळकर, नाशिक, काव्य : माती मागतेय पेनकिलर. शारदा घोडके, श्रीगोंदा, काव्य : अव्यक्ताचा चंद्र या साहित्यिकांचा सन्मान करण्यात आला. सन्मानचिन्ह, ग्रंथ संच आणि रु. ५,०००/- रोख असे पुरस्काराचे स्वरूप होते. जुन्या साहित्यसंग्रहाचे संवर्धन करणारे संग्राहक शब्बीर शेख यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

# ज्योती कोतकर यांचा 'नेशन बिल्डर अवॉर्ड'ने सन्मान

## शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याची दखल

**मुंबई । रयत समाचार**

शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट, नावीन्यपूर्ण आणि विद्यार्थीकेंद्रित कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गौरव म्हणून रोटरी क्लब ऑफ इंडिया तर्फे दिला जाणारा 'नेशन बिल्डर अवॉर्ड २०२५' यंदा ज्योती मच्छिंद्र कोतकर यांना प्रदान करण्यात आला. रोटरी क्लब ऑफ मुंबई वेस्ट कोस्ट यांच्या वतीने दुर्गादेवी सराफ ऑडिटोरियम, मुंबई येथे हा सन्मान प्रदान करण्यात आला. कोतकर या मिठानगर येथील इंग्लिश एमपीएस स्कूलमध्ये शिक्षिका म्हणून कार्यरत असून, विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी त्यांचे सातत्यपूर्ण आणि मूल्याधिष्ठित कार्य विशेष आहे. आधुनिक अध्यापन पद्धतींचा वापर, विद्यार्थ्यांशी जिव्हाळ्याचा संवाद आणि शिक्षणात नावीन्य आणण्याच्या



त्यांच्या प्रयत्नांची दखल घेऊन रोटरी क्लबने त्यांना हा मानाचा पुरस्कार जाहीर केला.कार्यक्रमात उपस्थित समीक्षकांनी गौरवोद्गार काढत म्हटले की, एक चांगला शिक्षक केवळ विद्यार्थ्याला ज्ञान देत नाही, तर त्याच्या आयुष्याची दिशा ठरवतो, कल्पनाशक्ती जागवतो आणि राष्ट्रनिर्मितीत मोठा वाटा उचलतो. कोतकर यांनी ही भावना कृतीतून सिद्ध केली आहे, असेही यावेळी सांगण्यात आले. हा पुरस्कार रोटरी क्लब ऑफ मुंबई वेस्ट कोस्टचे अध्यक्ष मिथुन गडा, सचिव राजेश कुश्ते, रीना पटेल, मेघना कुश्ते यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कोतकर यांच्या या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन, सहकारी शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.